**सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगातील व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्र. मवैअ-२०११/प्र.क्र.६२६/११/सेवा ३

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ७ ऑगस्ट, २०१२

**वाचा :-**

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एनपीए-१०९८/प्र.क्र.२०२/सेवा-१, दि. ६.६.२०००.

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक बीयुडी-१५००/७४६/प्र.क्र.२३०/ अर्थसंकल्प, दि. १८.८.२०००.

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एनपीए-१०९८/प्र.क्र.२०२/सेवा-१, दि. २४.८.२०००.

४) सार्वजनिक आरोग्य विभागा, शासन निर्णय क्रमांक मवैअ-१००८/२००/प्र.क्र.११६/ सेवा-३, दि. २८.७.२००९.

५) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक मवैअ-१००९/२३३/प्र.क्र.४५५/०९/ सेवा-३, दि. १.४.२०१०.

**शासन निर्णय :-**

राज्य शासनाच्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवेतील रुग्ण सेवेशी संबंधीत जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय अधिकारी विशेषज्ञ आणि वैद्यकीय अधिकारी गट-अ (राज्यस्तर) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सुधारीत व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता शासनाने राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवेत कार्यरत असणाऱ्या सर्व वैद्यकीय अधिकारी यांना (ज्यांना व्यवसायरोध भत्ता मिळतो तसेच ज्यांना व्यवसायरोध मिळत नाही असे दोन्ही प्रकारचे वैद्यकीय अधिकारी मिळून) ६ व्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीनुसार मूळ वेतनाच्या ३५% व्यवसायरोध भता मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतू त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसायरोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रु.८५०००/- पेक्षा जास्त नसावी..

२. सदर व्यवसायरोध भत्ता दि. १ जुलै, २०१२ पासून लागू होईल.

३. महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्य सेवेत ज्यांची नियुक्ती रुग्ण सेवेशी संबंधीत वैद्यकीय अधिकारी पदावर झालेली आहे अशा सर्व रुग्ण सेवेशी संबंधीत व रुग्ण सेवेशी संबंधीत नसलेल्या पर्यवेक्षकीय, कार्यकारी व रुग्णसेवेशी संलग्न असणाऱ्या पदांवर कार्यरत असणाऱ्या केवळ सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनाच सदर शासन निणर्यातील तरतूदी लागू राहतील. तसेच या विभागाचे नियंत्रणाखाली असलेल्या आयुर्वेदिक पदवीधारक वैद्यकीय अधिकारी ही या भत्त्यासाठी पात्र असतील.

४. सध्या ज्या पदांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय करण्यात आलेला आहे, त्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारे खाजगी, स्वतंत्र व्यवसाय करता येणार नाही व तसे आढळल्यास ते नियमानुसार कारवाईस पात्र राहतील तथापि, सदर तरतुदीची अमंलबजावणी व सनियंत्रण करण्याची खालील कार्यपध्दती/यंत्रणा विहित करण्यात येत आहे.

४.१) व्यवसायरोध भत्ता लागू केला असल्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्याला याबाबत व्यवसायरोध भत्ता न घेण्याबाबतचा विकल्प देता येणार नाही.

४.२) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्य करणे आवश्यक राहील.

४.३) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांना स्वत:च्या नावे रुग्णालय, दवाखाना चालविता येणार नाहीत किंवा नोंदणी करता येणार नाही.

४.४) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांना अन्य खाजगी रुग्णालयात किंवा दवाखान्यात जावून आरोग्य सेवा देता येणार नाही. विभागातील सर्व वैद्यकीय अधिकारी यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय केला असल्याने खाजगी व्यवसायास पुर्णत: बंदी राहील याबाबत शासनाकडून आकस्मिक भेटीव्दारे ही यासंबंधी चौकशी केली जाईल व त्यावेळी वैद्यकीय अधिकारी खाजगी व्यवसाय करीत असल्याचे आढळून आल्यास संबंधीत वैद्यकीय अधिकारी जबर शिक्षेस पात्र राहील.

४.५) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांची कोणत्याही रुग्णालयात/ दवाखान्यात कोणत्याही प्रकारची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भागीदारी असता कामा नये.

४.६) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या अधिकारी ज्या शासकिय वैद्यकीय संस्थेमध्ये काम करीत असेल त्या वैद्यकीय संस्थेच्या नियंत्रण अधिकाऱ्याने त्यांच्या संस्थेतील वैद्यकीय अधिकारी खाजगी व्यवसाय करीत नाहीत व मुख्यालयाच्या ठिकाणी राहतात हे दरमहा प्रमाणित करणे बंधनकारक राहील.

४.७) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या ज्या वैद्यकीय अधिकाऱ्याबाबत प्रतिकुल अहवाल प्राप्त होईल त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनूसार तात्काळ शिस्तभंगविषयक विहीत कार्यवाही सुरु करण्याची जबाबदारी संबंधित आरोग्य सेवा परिमंडळाच्या उपसंचालक वा यथा स्थिती संचालक आरोग्य सेवा यांची राहील. तसेच विभागीय चौकशी अंती अपराध दोष सिध्द झाल्यानंतर ज्या दोषी वैद्यकीय अधिकाऱ्यांवर शिक्षेचे आदेश बजावले जातील त्या अपराध/दोषारोप सिध्द झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना शिक्षा कालावधी दरम्यान व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

४.८) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेले अधिकारी कार्यरत असलेल्या आरोग्य संस्था / कार्यालयाच्या दर्शनी भागात "येथे काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असल्याने खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे", असा फलक लावण्यात यावा.

४.९) अधिकाऱ्यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असल्याची व त्यांना खाजगी व्यवसाय करण्यास प्रतिबंध असल्याची माहिती शासकीय संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

४.१०) वैद्यकीय अधिकाऱ्याने आयकर विभागास सादर केलेल्या आयकर विषयक विवरणपत्राची (Income tax return) प्रत माहितीसाठी कार्यालय प्रमुखास सादर करावी.

४.११) जिल्हा परिषद स्तरावरील वैद्यकीय अधिकारी खाजगी व्यवसाय करीत नसल्याबाबतचा अहवाल वर्षातून एकदा होणाऱ्या आमसभेमध्ये तालुका आरोग्य अधिकारी वा त्यांचे वरीष्ठ पर्यवेक्षकिय अधिकारी यांनी तसेच राज्य स्तरावरील वैद्यकीय अधिकाऱ्याच्याबाबतीत अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय यांनी सादर करावा.

४.१२) जिल्हा स्तरावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्याबाबतीत संबंधित शासकीय वैद्यकीय संस्थेच्या नियंत्रण अधिकाऱ्याने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना वैद्यकीय अधिकारी खाजगी व्यवसाय करत नसल्याबाबतचा अहवाल वर्षातून एकदा सादर करावा.

४.१३) ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रशिक्षणावर पाठविण्यात येईल अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

५.  व्यवसायरोध भत्याच्या अनुषंगाने असे सूचित करण्यात येते की, सदरचा व्यवसायरोध भत्ता हा निवृत्ती वेतनासाठी आणि शासकिय निवासस्थानासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्कासाठी हिशेबाबत धरण्यात यावा. या व्यतिरिक्त प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, घरभाडे भत्ता, शहर भत्ता वेतन निश्चिती इत्यादींसाठी तो हिशोबात धरण्यात येऊ नये.

६.  व्यवसायरोध भत्याच्या पोटी येणारा खर्च, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्यापोटी येणारा खर्च ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतो त्या लेखाशीर्षाखाली खर्ची दाखविण्यात यावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७.  या आदेशान्वये अनुज्ञेय असलेला व्यवसायरोध भत्या मूळ वेतनाशी निगडीत असल्याने शासनाच्या स्थायी आदेशानुसार ज्या कालावधी करिता मुळ वेतन अदा केले जात नाही अशा कालावधीसाठी व्यवसायरोध भत्या अनुज्ञेय असणार नाही.

८.  सदर शासन निर्णय वित्त विभागच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १२४/सेवा-५, दिनांक २५.७.२०१२ अन्वये मिळविलेल्या सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे.

९.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (**www.maharashtra.gov.in**) या शासनाच्या संकेत स्थळावर (बेबसाईट) प्रसिध्द करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०१२०७३११२०१४७०८००  असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( अनिरुध्द जेवळीकर )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

संचालक आरोग्य सेवा, मुंबई.
अभियान, संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई.
प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एडस नियंत्रण सोसायटी, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
उपसंचालक आरोग्य सेवा (सर्व मंडळे) (टी.बी.बी.सी.जी.सहीत)
जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
अधिक्षक, वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये.
अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालये/अधिक्षक, उरो रुग्णालय/क्षय रुग्णालये/पोलीस सर्जन, मुंबई
प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर
प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रे (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखापरीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
वैद्यकीय अधिक्षक, कुटीर रुग्णालये/वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व)
मंत्रालयीन विभाग (सर्व)

मा.मंत्री (सा.आ. व कु. क) यांचे खाजगी सचिव/रा.मं. (सा.आ. व कु. क) यांचे खाजगी सचिव
सचिव (आरोग्य व कु. क.) यांचे स्वीय सहाय्यक, सा.आ.वि.
आयुक्त कुटुंब कल्याण यांचे स्वीय सहाय्यक
वित्त विभाग (सेवा-१०), व्यय-१३, मंत्रालय, मुंबई.
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती - सेवा-३.